श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

एप्रिल २०२३ | वर्ष-११ अंक-४ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने १२

## कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन




*डावीकडून - डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. ज्योती अय्यर, मा. आमदार श्री. शेखरजी निकम, श्री. केतन पवार, श्री. अशोकराव जोशी आणि श्रीमती सावित्री होमकळस (माजी नगराध्यक्षा, चिपळूण)*

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टने डेरवण येथे रुग्णालयाबरोबरच अनेक शैक्षणिक उपक्रमही चालविले आहेत. १९९८ साली जून महिन्यात डेरवणसारख्या लहानशा गावात इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून ट्रस्टने एका अनोख्या प्रयोगाला प्रारंभ केला. खेडेगावात इंग्रजी माध्यम हा पंचवीस वर्षांपूर्वी खरोखरच अभिनव प्रयोग होता. ग्रामीण भागातील मुलांना प्राथमिक स्तरावर इंग्रजी माध्यम उपलब्ध झाल्याने स्पर्धात्मक वातावरणाला ती आत्मविश्वासाने सामोरी जाऊ लागली. दोन वर्षांतच ट्रस्टने दि. १ फेब्रुवारी २००१ रोजी 'समर्थ नर्सिंग स्कूल'ची सुरुवात केली आणि प्रथम नर्सिंगचे बेसिक कोर्स शिकविण्याची सोय असलेल्या या शाळेत आता नर्सिंगचे पदव्युत्तर शिक्षणही मिळते. रुग्णालयाला त्यामुळे प्रशिक्षित परिचारिका तर मिळू लागल्याच पण या नर्सिंग स्कूलमधून ग्रामीण भागातील अनेक मुलींना उत्तम प्रशिक्षण मिळाले आणि त्यांना मोठमोठ्या शहरी रुग्णालयात तसेच सरकारी आरोग्य खात्यात नोकऱ्या मिळून त्या स्वयंपूर्ण झाल्या. रुग्णालय जसजसे वाढू लागले तसतसे रुग्णालयातील विविध तांत्रिक जबाबदाऱ्या सांभाळणारे मनुष्यबळही मिळणे गरजेचे झाले. त्यासाठी फोरेन्सिक मेडिकल टेक्निशिअन, एन्डोस्कोपी टेक्निशिअन, मेडिकल लॅबोरेटरी टेक्निशिअन, डायलिसिस टेक्निशिअन, ऑपरेशन थिएटर टेक्निशिअन, अशा अनेक तंत्रकुशल माणसांची गरज निर्माण झाली. त्या वेळी ट्रस्टने एक महत्त्वाचे धोरण आखले की या परिसरातील मुलांनाच जर आपण हे तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले तर रुग्णालयाची गरज तर भागेलच, पण त्याचबरोबर ग्रामीण युवकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. त्यातून ट्रस्टने विविध पॅरामेडिकल कोर्स शिकविणारे 'कॉलेज ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज' सुरू केले. शिवाय 'बायोमेडिकल इन्स्ट्रुमेंटेशन' आणि 'सायकॉलॉजिकल हेल्थ ॲन्ड बिहेविअरल सायन्स' हे दोन पदवी



*संगणक कक्षाची पाहणी करताना श्री. निकम आणि अन्य पाहुणे*



*स्पेस-लॅबची पाहणी करताना सन्माननीय पाहुणे*

अभ्यासक्रमही मुंबई विद्यापीठाच्या मान्यतेने सुरू केले. यथावकाश भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय आणि फिजिओथेरपी कॉलेजही ट्रस्टने सुरू केले.

ट्रस्टचे हे चौफेर कार्य सजगपणे समाजसेवेच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या मुंबईच्या 'वात्सल्य ट्रस्ट'च्या लक्षात आले नसते तरच नवल! 'वात्सल्य ट्रस्ट' ही सेवाभावी संस्था अनाथ, निराधार आणि वंचित मुलांसाठी मोठे काम करीत आहे. अशा मुलांना तसेच उपेक्षित, अकुशल तरुणांना आधार देऊन सक्षम बनविणे यासाठी ही संस्था अखंड कार्यरत आहे. या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी काही महिन्यांपूर्वी डेरवणला भेट देऊन येथील ट्रस्टच्या कार्याची पाहणी केली आणि अकुशल तरुण-तरुणींसाठी काही कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करण्यासंबंधी एक योजना उभय संस्थांच्या चर्चेतून आकाराला आली. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या नेहमीच्या धडाक्याच्या कार्यपद्धतीप्रमाणे अगदी अल्पावधीत सर्व योजनेचे तपशील ठरून शनिवार, दि. १ एप्रिल २०२३ रोजी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि वात्सल्य ट्रस्ट, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने संचालित, 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' प्रमाणित 'कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रा'चे उद्घाटन सह्याद्री शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, मा. आमदार श्री. शेखरजी निकम (चिपळूण-संगमेश्वर मतदार संघ) यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या केंद्रात दहावी उत्तीर्ण मुलामुलींसाठी टेलरिंग आणि फॅशन डिझायनिंग (बेसिक आणि ॲडव्हान्स्ड अभ्यासक्रम), ब्युटी पार्लर (बेसिक आणि ॲडव्हान्स्ड अभ्यासक्रम), संगणक प्रशिक्षण आणि जनरल ड्युटी असिस्टंट असे वेगवेगळ्या कालावधीचे चार अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहेत. या प्रशिक्षणासाठी माध्यमिक शाळेच्या नव्या इमारतीत सुसज्ज अशा चार कक्षांचे उद्घाटन प्रमुख पाहुणे मा. शेखरजी निकम यांच्या शुभहस्ते आणि ट्रस्टचे मुख्य विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, 'वात्सल्य ट्रस्ट'चे कार्यकारी अध्यक्ष श्री. गिरीश कुलकर्णी, सावर्डे गावचे उपसरपंच झमीर मुल्लाजी, आरोग्य संचालिका डॉ. सुवर्णा पाटील, शिक्षण संचालिका सौ. शरयू यशवंतराव, डॉ. नाडकर्णी, डॉ. ऋता मुल्हेरकर, या प्रकल्पासाठी समन्वयक म्हणून काम करणाऱ्या डॉ. ज्योती अय्यर, स्थानिक प्रतिष्ठित नागरिक, ट्रस्टचे कार्यकर्ते, कर्मचारी वर्ग आणि युवा वर्ग यांच्या उपस्थितीत झाले.



मा. शेखरजी निकम यांच्या हस्ते दीपप्रज्वलन



प्रमुख पाहुण्यांचा सत्कार



श्री. गिरीश कुलकर्णी यांचा सत्कार



सौ. शरयू यशवंतराव प्रास्ताविक करताना

औपचारिक उद्‌घाटनानंतर संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात झालेल्या समारंभाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, श्रीसद्‌गुरू सहजानंदसरस्वती महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण आणि नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थिनींनी गायलेले ईशस्तवन यांनी झाल्यावर प्रमुख पाहुणे श्री. निकम आणि वात्सल्य ट्रस्टचे श्री. कुलकर्णी यांचा डॉ. सुवर्णा पाटील यांनी शाल, श्रीफळ पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला तसेच अन्य सन्माननीय पाहुण्यांचेही पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

आपल्या प्रास्ताविक भाषणात सौ. यशवंतराव म्हणाल्या की श्रीदिगंबरदास महाराजांनी असे विचार व्यक्त केलेले आहेत की आपल्या या विशाल देशातील संख्येने प्रचंड असलेल्या लोकांचे सर्वच प्रश्न सरकार सोडवू शकणार नाही. त्यासाठी निरपेक्षपणे काम करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांनीही पुढे आले पाहिजे. त्यासाठीच त्यांनी येथे दोन ट्रस्ट स्थापन करून अनेक समाजोपयोगी कामे सुरू केली. ते काम कालानुरूप निरंतर पुढे नेण्याचे काम श्रीकाकामहाराज करीत आहेत. शिक्षण, आरोग्य, क्रीडा, समाजसेवा अशा अनेक क्षेत्रात हे काम सुरू आहे. समाजाच्या मूलभूत गरजा व्यवस्थित भागल्या तरच त्याला प्रगतीच्या मार्गावर नेता येते. त्यातही महिला हा समाजाचा कणा असून त्या सक्षम झाल्यास समाजाची प्रगती होईल असे त्यांचे सांगणे असे. त्यासाठी ‘रुरल एम्पॉवरमेंट ॲन्ड कम्युनिटी हेल्थ’ हा कार्यक्रम ट्रस्टने सुरू केला. हे कौशल्य विकास केंद्र हा त्या कार्यक्रमाचाच एक भाग आहे असे सांगून त्यांनी या अभ्यासक्रमांची थोडक्यात माहिती दिली.

यानंतर ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. ज्योती अय्यर यांनी आपले विचार मांडले. त्या म्हणाल्या, ‘‘प्राथमिक शिक्षण आता सर्वांना सहजपणे उपलब्ध आहे, पण त्या नंतर काय करायचे हाच सर्वांपुढे प्रश्न असतो. पैसे असतील त्यांना शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध होतात. पण किमान नोकरी मिळण्यासाठी उपयुक्त ठरतील असे अभ्यासक्रम सहजपणे उपलब्ध होत नाहीत. थिअरीचे शिक्षण मिळाले तरी प्रॅक्टिकलचे ज्ञान मिळणे हेही महत्त्वाचे आहे. त्यासाठी दीर्घ मुदतीच्या कोर्सऐवजी कमी कालावधीचे कोर्स जे काही कौशल्य शिकवतील आणि ज्याचा उपयोग स्वत:चा व्यवसाय करण्यासाठी अथवा नोकरी मिळविण्यासाठी होईल, असे कोर्स आम्ही सुरू करीत आहोत. याची फी अल्प आहे आणि अधिकृत सरकारी मान्यता असलेले हे कोर्स आपण मिळविलेल्या कौशल्याचे प्रमाणपत्रही देणार आहेत. शिवाय जॉब-कार्डही देण्यात येणार आहे. बाहेरगावच्या मुलांसाठी येथे अल्प शुल्कात निवासव्यवस्थाही करण्यात आली असून हे कोर्स अल्प मुदतीत ‘क्रॅश कोर्स’च्या स्वरूपातही करता येतील.’’ सुमारे ३५-४० विद्यार्थ्यांनी नावे नोंदविली असून सोमवारी तीन एप्रिलपासून हे अभ्यासक्रम सुरू होतील असे सांगून परिसरातील मुले याचा चांगला फायदा घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

वात्सल्य ट्रस्टचे कार्यकारी अध्यक्ष श्री. गिरीश कुलकर्णी आपले विचार व्यक्त करताना म्हणाले, ‘वात्सल्य ट्रस्टने संगणक प्रशिक्षण, शिवणकाम अशी सुमारे ५० केंद्रं महाराष्ट्रात वेगवेगळ्या संस्थांच्या सहकार्याने सुरू केली आहेत. पण तीन-चार महिन्यांपूर्वी जेव्हा मी प्रथमच डेरवणला या ट्रस्टमध्ये आलो तेव्हा येथे एवढ्या व्यवस्थितपणे एवढे मोठे काम सुरू असेल याची मला कल्पना नव्हती. या संस्थेशी जोडलं जाणं हा आम्ही आमचा सन्मान समजतो. गेल्या पंधरा दिवसात येथील या चार कोर्ससाठीची व्यवस्था इथल्या लोकांनी एवढ्या झपाट्याने उभी केली त्याचं मला विशेष कौतुक वाटत आहे. समोर प्रेक्षकात मला काही प्रशिक्षणार्थीही दिसत आहेत. त्यांनी याचा जरूर लाभ घ्यावा.’’

वात्सल्य ट्रस्टची माहिती देताना ते म्हणाले, ‘‘वात्सल्य ट्रस्टची स्थापना ‘अर्भकालय’ म्हणून १९८३ च्या फेब्रुवारीमध्ये झाली. आजवर ट्रस्टने १४०० मुलांचे दत्तकविधान केले असून




*डॉ. ज्योती अय्यर आपले विचार व्यक्त करताना*




*श्री. गिरीश कुलकर्णी –*
*'या संस्थेशी जोडलं जाणं हा आम्ही आमचा सन्मान समजतो.'*

ही मुले चांगल्या घरांमध्ये वाढत आहेत. सानपाड्याच्या बालिकाश्रमात पन्नास निराधार मुली (सहा ते अठरा वयोगटातील) वाढत आहेत. १८ वर्षांवरील दहा मुली उच्च शिक्षण घेत आहेत. पंधरा महिलांसाठी एक वृद्धाश्रम ट्रस्टतर्फे चालविला जातो. कांजुरमार्ग, अलिबाग आणि सानपाडा येथे आम्ही एकूण अडीचशे दिव्यांग मुलांसाठी उपचार केंद्र चालवतो. ऑक्युपेशनल, स्पीच, फिजिओ अशा थेरपीज तेथे दिल्या जातात. काउन्सिलिंग केले जाते. २००६ पासून परिचारिका आणि संगणक प्रशिक्षण देणे सुरू झाले. आमच्या असं लक्षात आलं की अनेक ठिकाणी 'एनजीओज्' मोठ्या प्रमाणावर आणि उत्तम काम करीत आहेत. आपण त्यांच्याशेजारी उभं राहिलं तर हे कौशल्य प्रशिक्षणाचं काम गावागावात पोहोचेल. आणि मला सांगायला आनंद वाटतो की अडीच हजार मुलांनी गेल्या एका वर्षात आमच्या केंद्रातून असे प्रशिक्षण घेतले. यावर्षी आम्ही 'नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'चे ट्रेनिंग पार्टनर झालो आहोत. त्यामुळे त्यांचे सर्टिफाईड कोर्सेस आम्ही आता चालवतो. त्याचा लाभ मुलांनी घ्यावा आणि स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे प्रयत्न करावेत. प्रशिक्षण घेऊन स्वस्थ न बसता त्यांनी नोकरी वा व्यवसायाद्वारे अर्थार्जन करावे.

डॉ. सुवर्णा पाटील आपल्या भाषणात म्हणाल्या, ''सोन्याचा दागिना घडवायचा तर कारागीर कुशल असावा लागतो. तरुणांमधील सोन्यासारखे गुण पारखून त्यांना फुलायला मदत करणे, त्यांचे चारित्र्य घडविणे म्हणजेच कौशल्य विकास. पुढची पिढी स्वावलंबी झाली पाहिजे या उद्देशाने ट्रस्टने ही संधी आज उपलब्ध करून दिली आहे. शैक्षणिक गुणवत्तेची मोठी सर्टिफिकेट्स मिळवण्यापेक्षा अंगभूत गुण ओळखून त्यानुसार ज्ञान मिळाले तर मोठी झेप घेण्याची ताकद मुलांना या कार्यक्रमातून मिळेल. त्यासाठी श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट आणि वात्सल्य ट्रस्ट या दोन समविचारी संस्था एकत्र आल्या आहेत, शिवाय आमचे लोकप्रिय आमदारसाहेब यांच्या शुभहस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होत आहे, त्यामुळे तरुणांच्या पंखांना भरारी घेण्याचे बळ देण्याचे आमचे स्वप्न नक्कीच पूर्ण होईल.''

शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. शेखरजी निकम यांनी कौशल्य विकास कार्यक्रमाच्या चारही अभ्यासक्रमांचे उद्घाटन झाल्याचे जाहीर केले आणि पुढे ते म्हणाले, ''आज अशा चांगल्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याची संधी मला मिळाली याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. खेडेगावातील गरजू तरुण, तरुणी आणि महिलांनाही स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रशिक्षित करण्यात आणि पुढे रोजगार निर्मिती करण्यात उपयुक्त असा हा कार्यक्रम दोन्ही ट्रस्ट संयुक्तपणे करीत आहेत. विठ्ठलराव जोशी ट्रस्ट जेव्हा एखादा कार्यक्रम हाती घेतो, तेव्हा तो उत्तम तऱ्हेने पूर्ण होणार याची खात्री असते. याचे कारण म्हणजे, येथील इन्फ्रास्ट्रक्चर आणि श्रीकाकामहाराजांची शिस्त, त्यांचा स्वच्छतेविषयीचा मनापासूनचा आग्रह, हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो खर्च करण्याची तयारी. त्यामुळे वात्सल्य ट्रस्टच्या कुलकर्णीसाहेबांना मी नक्की आश्वस्त करीन की हे कोर्स नक्की उत्तम तऱ्हेने चालतील आणि येथे प्रशिक्षण घेतलेले विद्यार्थी दोन-चार वर्षांत आपला व्यवसाय ताकदीने करू शकतील.

प्रत्येकाच्या अंगात कोणते ना कोणते कौशल्य असतेच, पण ते स्वत: ओळखणे हे महत्त्वाचे. काही जण आपल्या कौशल्याचा उपयोग चांगल्यापेक्षा वाईट कामासाठी करत असतात. उपजत कौशल्य वाढविणे आणि जे आपल्यात नाही ते मिळवणे यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यासाठी माणसाने शिकले पाहिजे आणि शिकण्यासाठी आधी अंगीचा मीपणा बाजूला केला पाहिजे. आपल्याला सगळंच येतंय असे म्हणणाऱ्याला काहीच शिकता येत नाही आणि आपल्यात कशाचा अभाव आहे हे ओळखता आले पाहिजे. जे गुण आहेत ते वाढवावे आणि जे नाहीत ते




*डॉ. सुवर्णा पाटील - तरुणांमधील सोन्यासारखे गुण पारखून त्यांचे चारित्र्य घडविणे म्हणजेच कौशल्य विकास.*




*प्रत्येकाच्या अंगात कोणते ना कोणते कौशल्य असतेच, पण ते स्वत: ओळखणे हे महत्त्वाचे - मा. शेखरजी निकम*

दुसऱ्याकडून आत्मसात करावेत. फक्त शिक्षकच शिकवतो असे नाही. अगदी सामान्य माणसाकडूनही आपणाला अनेक गोष्टी शिकता येतात. हार्ड स्किल्सबरोबर अनेक सॉफ्ट स्किल्स शिकणे आवश्यक आहे. आपणाला चांगले बोलता आले पाहिजे, चांगले व्यक्त होता आले पाहिजे. वडीलधाऱ्यांचा आदर करता आला पाहिजे. त्यामुळे आपणालाच चांगली मदत होते. आपली भाषा जर नीट नसेल तर बऱ्याच अडचणी येतात.

डेरवण-सावर्डे यासारख्या छोट्याशा गावात मेडिकल कॉलेज होईल असे कोणी म्हटलं असतं तर ते आपल्याला पटलं नसतं. पण येथे ते झालं आहे ही आपणा सर्वांनाच अभिमानाची गोष्ट आहे. कारण एकतर अनेकांना रोजगार तर मिळालाच, पण त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. येथे इंग्रजी माध्यमाची शाळा आहे. केवळ फी घेऊन शाळा चालवता येत नाही. ते सोपं नसतं. पण ट्रस्टने आपलं सर्वस्व तेथे ओतलं आहे. मघाशी आपण स्पेस-लॅबमध्ये पाहिलं, ती मुलं जी बोलत होती ती सधन पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबातील होती काय? ती आजूबाजूच्या ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील होती. ती जेव्हा इंग्लिशमध्ये उत्तम तऱ्हेने विवरण करू शकतात, तेव्हा ही आयुष्यात कुठेही कमी पडणार नाहीत याची खात्री पटते.

येथे चार प्रकारचे अभ्यासक्रम आहेत ते महत्त्वाचे आहेत. नर्सिंग असिस्टंट हा महत्त्वाचा कोर्स आहे. डॉक्टर उपलब्ध नसताना त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. अशा छोट्या यंत्रणा सर्वच क्षेत्रात वेळप्रसंगी उपयुक्त ठरतात. बाकी शिकणे हे वैयक्तिक ज्याच्या-त्याच्यावर अवलंबून आहे. हे दालन उपलब्ध करून देण्याचे काम श्रीकाकामहाराज, ट्रस्ट, डॉ. सुवर्णा पाटील, यशवंतराव मॅडम यांच्याकडून झालेलं आहे. त्यामुळे परिसरातील महिला-भगिनी, युवकांनी याचा विचार करून शिक्षण घेऊन स्वयंपूर्ण होणे आवश्यक आहे. येथे एखादा चांगला प्लंबरही मिळणे मुश्किल होते. आम्हाला मजुरीचे दर मुंबईप्रमाणे हवे असतात, पण मुंबईच्या तोडीचे कौशल्य आणि कामाची शिस्त मात्र आमच्याजवळ नसते. याचाही विचार या निमित्ताने व्हावा.

प्रशिक्षणार्थींना मी सांगेन की कोणतेही काम करणे अप्रतिष्ठेचे समजू नका. बुटपॉलिश करणार असाल तर त्यातही उच्चतम कौशल्य मिळवा. तरच रोजगाराची समस्या पुढील काळात सुटू शकेल. 'कौशल्य विकास' ही डॉ. अब्दुल कलाम यांची कल्पना. ती शिक्षण, शेती, संरक्षण, उद्योग अशा सर्वच क्षेत्रांना केंद्रस्थानी ठेवणारी आहे. शिक्षण हा पाया आहे. पण एखाद्या क्षेत्रातले ज्ञान हे प्रात्यक्षिकाद्वारे मिळाले तर ते अधिक सखोल असते. मी कृषी-पदवीधर असलो तरी शेतकऱ्याशी बोलताना मी जपून बोलतो. शिवाय ज्ञान आणि माहिती या पुन्हा भिन्न गोष्टी आहेत. तुमच्या मोबाईलमध्ये गुगलवर सर्व माहिती उपलब्ध आहे. ज्ञान मिळवण्यासाठी तुम्हाला सतत शिकत राहिलं पाहिजे. शिक्षकांनीही स्वत:ला सतत अद्ययावत ठेवले पाहिजे. कारण गुगलवर मुलांनी पुढची माहिती शोधलेली असते. आता आम्ही शाळेत ज्या गोष्टी मुलांना उपलब्ध करून दिलेल्या पाहिल्या त्या आमच्या-तुमच्यावेळी नव्हत्या. मुलं असं बघत शिकत गेली तर त्यांची जिज्ञासा जागृत होते आणि त्यामुळे मुलं आपोआप चांगल्या मार्गाला लागतात. आजची मुलं हुशार आहेत, स्मार्ट आहेत, फास्ट आहेत. त्याना केवळ जोड देण्याची गरज आहे आणि ते काम अशा कोर्सेसच्या माध्यमातून होत आहे. ज्यांना दहावीनंतर पुढे शिकणे शक्य नाही त्यांनी अशा कोर्सेसमधून कौशल्य प्राप्त करावे. फॅशन डिझायनरही लाखो रुपये मिळवतो! पण त्यासाठी त्याने केलेले कष्टही माहीत करून घेतले पाहिजेत. एखाद्या क्रिकेटपटूचे ऐश्वर्य आपण पाहतो. पण त्याने घेतलेले कष्टही आपण लक्षात घेतले पाहिजेत. कष्टाला सन्मान देणारा माणूस कधीही मागे राहू शकत नाही. माझे अनेक मित्र सामान्य स्थितीतून

कष्टाच्या आधारे उच्चपदावर पोहोचले. आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे आपले दोष ओळखायला शिकलं पाहिजे. केवळ दुसऱ्याचे दोष काढून काहीच साध्य होत नाही. आपले दोष ओळखले तरच वस्तुस्थितीचे यथार्थ ज्ञान होते. आपल्यातल्या गुणांना योग्य पद्धतीने चालना देणे हे महत्त्वाचे आहे.

मी काकामहाराजांना आणि विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टला मनापासून धन्यवाद देतो की आपल्या मतदार संघात तरुण तरुणींना एक उत्तम संधी त्यांनी वात्सल्य ट्रस्टच्या साथीने उपलब्ध करून दिली आहे. त्याचा उपयोग कसा करून घ्यायचा हे प्रत्येकाने व्यक्तिश: ठरवायचे आहे. मात्र एक मार्ग दाखविण्याचे काम या उभय ट्रस्टनी केले आहे. शिवाय येथे मिळणारे कौशल्य आयुष्यभर आपली साथ करणार आहे. कॉम्प्युटर शिकला आणि व्यवसाय दुसरा केला म्हणून ते शिक्षण काही फुकट जात नाही. पूर्वी लिहिता-वाचता येणाऱ्याला साक्षर म्हणत. आता कॉम्प्युटर येत नसेल तर त्याला साक्षर समजले जात नाही. टेलरिंगचा उपयोग घरात नेहमीच होत असतो.

आमच्या लोकांना ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मी पुन्हा एकदा दोन्ही ट्रस्टचे आभार मानतो. आपण मला येथे प्रेमाने बोलवून शाल पांघरलीत, त्यामागे तुमच्या भावना आहेत, आणि त्यासंबंधीची जी कर्तव्ये आहेत त्याचीही मला जाणीव आहे, आणि ती जाणीव ठेऊन मी काम करण्याचा प्रयत्न करीन. जय हिंद, जय महाराष्ट्र.'

आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे सुविहित सूत्रसंचालन सौ. अश्विनी खांडेकर यांनी केले.



*संगणक कक्ष*

# शास्त्रीय सल्लागार समितीची बैठक
## (Scientific Advisory Committee - SAC)
## टाटा मेमोरियल सेंटर, नवी मुंबई येथे संपन्न






संशोधनाला प्राधान्य मिळावे व योग्य मार्गदर्शन मिळावे याकरिता स्थापन झालेल्या या समितीची १५ वी सभा टाटा मेमोरियल सेंटर, नवी मुंबई येथे घेण्यात आली.

SAC कमिटीचे अध्यक्ष, डॉ. अनिल काकोडकर यांनी बैठकीला उपस्थित सर्वांचे स्वागत करून आभार मानले. या बैठकीत भविष्यातील योजना आणि RGSTC प्रकल्प, तसेच IIT मुंबई, RUMD - TIFR हैदराबाद, कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आदी संस्थांबरोबरच्या सहयोगाविषयी विस्तृत चर्चा झाली.

काही नवीन प्रकल्पांसंबधीही विचारविनिमय झाला.

१. ग्रामीण भागात मधुमेहाचे लवकर निदान आणि प्रतिबंध यासाठी बायोमार्कर म्हणून मायक्रोआरएनए संशोधन करणे.

२. कोकणातील तरुण मुलांचे आरोग्य सुधारण्यासाठी फोर्टिफाइड राइसचा वापर

३. टिश्यू कल्चर लॅबबद्दल चर्चा झाली

तसेच डी.बी.टी. ला सादर केलेल्या काही संशोधनात्मक प्रकल्पांबद्दलही विचारविनिमय झाला.

# स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथी

भ. क. ल. वालावलकर रुग्णालय आणि वैद्यकीय महाविद्यालयात शनिवार, दि. २५ फेब्रुवारी २०२३ रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर पुण्यतिथीसाठी श्री. रवींद्र साठे यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

श्री. रवींद्र साठे हे १९९२ पासून 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी'त कार्यरत असून कार्यक्रम समन्वयक, कार्यक्रम संचालक, कार्यकारी संचालक पदापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास प्रबोधिनीच्या महासंचालकपदापर्यंत येऊन ठेपला. खादी आणि ग्रामोद्योगांना आर्थिक उत्तेजना देण्यासाठी स्थापना करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सभापतीपदी रवींद्र साठे यांची नियुक्ती झालेली आहे.

सकाळी १०.०० वाजता स्वातंत्र्यवीर सावरकर आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्मारकांना पुष्पांजली वाहून संस्थेच्या बहुउद्देशीय सभागृहात सभेला प्रारंभ झाला. दीपप्रज्वलन आणि पाहुण्यांचा परिचय तसेच स्वागत झाल्यावर पाहुण्यांनी उपस्थित श्रोतृवर्गाला संबोधित केले.

व्याख्यानाचा आरंभ करताना सर्वप्रथम रवींद्रजींनी मुलांना सांगितले, की लोकमान्य टिळक हे सावरकरांचे गुरू होते आणि म्हणूनच स्वातंत्र्यवीर सावरकर व लोकमान्य टिळक या दोघांचीही चरित्रे आपण वाचली पाहिजेत. यानंतर त्यांनी सावरकरांचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान यावरील विचार आपल्या व्याख्यानाद्वारे मांडले.

सावरकरांविषयी बोलताना ते म्हणाले, ''सावरकर म्हणतात, माझे जीवन जाणत्या आरंभापासून भारतीय राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाशी संबद्ध झाले आहे आणि माझ्या समकालीन पिढीतील लक्षावधी तरुणांच्या आयुष्याची दिशा पालटून जावी इतका माझ्या मतांचा, सहवासाचा त्यांच्या जीवनावर प्रभाव पडला आहे.''






*श्री. रवींद्र साठे स्वा. सावरकर पुण्यतिथीनिमित्ताने आपले विचार व्यक्त करताना*

सद्यस्थितीसंबंधी बोलताना रवींद्रजी म्हणाले की राहुल गांधींनी अप्रत्यक्षरीत्या सावरकर जगभर प्रसिद्ध केले ते त्यांच्यावरील विविध चुकीच्या आरोपांमुळे. काँग्रेस पक्षाने भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा करण्यापूर्वीच १९०० मध्ये सावरकरांनी 'स्वातंत्र्य लक्ष्मी की जय' ही घोषणा केली होती व त्याचा हेतू तरुणांना स्वातंत्र्यप्राप्तीच्या यज्ञात हौतात्म्याचे बाळकडू पाजणे हा होता.

रवींद्रजीनी सावरकरांच्या जीवनाचे मुख्य पाच टप्पे सांगितले. नाशिक, पुणे, लंडन, अंदमान आणि रत्नागिरी हे टप्पे त्यांच्या स्वातंत्र्यासाठीच्या योगदानाचे साक्षीदार आहेत. सावरकर 'बॅरिस्टर' पदवी संपादन करण्यासाठी पंडित श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या मदतीने लंडनला गेले; पण त्या जाण्यामागील त्यांचा मुख्य हेतू ब्रिटिश राजधानीत सुरुंग लावणे हा होता व जे भारतीय इंग्रजांची चाकरी करत आहेत त्यांच्या हृदयात स्वातंत्र्याचे स्फुलिंग निर्माण करणे हा होता. यात त्यांना यश आले आणि मदनलाल धिंग्रासारखा क्रांतिकारक त्यांच्याच विचारांनी प्रभावित झाला. एक अय्यर नावाचा क्रांतिकारक सावरकरांविषयी बोलताना म्हणतो, 'Veer Savarkar was the Sun and we were it's Satellites. लंडनमध्ये असताना सावरकरांनी पार्लमेंटचा पास मिळवला. बॉम्ब विद्या शिकून सेनापती बापटांच्या सहकार्याने त्याचा पहिला प्रयोगही केला. मॉर्सेलिसची उडी हा सावरकरांचा सर्वोच्च पराक्रम आहे. पुढे सावरकरांना काळ्यापाण्याची शिक्षा सुनावली गेली. या शिक्षेदरम्यान जेव्हा त्यांची पत्नी त्यांना भेटायला आली; तेव्हा सावरकर आपल्या पत्नीला उद्देशून म्हणतात, 'मुलामुलींची वीण वाढवणे व चार काटक्या एकत्र करून घरटे बांधणे हे तर कावळे चिमण्या करतात; परंतु आपल्या एका संसाराची जर आपण आहुती दिली; तर असंख्यांच्या संसारात सोन्याचा धूर निघेल.'

सावरकर विचार करायला लागले, की पन्नास वर्षे तुरुंगात मी काय करू? पुढे त्यांना कळलं की आपल्या दोन बंधूंनाही शिक्षा सुनावली गेली आहे. त्यावर सावरकर म्हणतात, 'स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी घरच्या बागेतील दोन फुले तोडली व श्रीरामांच्या चरणी अर्पण केली.' हे स्वातंत्र्यासाठीचे सावरकरांचे बलिदान होते.

सावरकरांना ५० वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा सुनावली गेली. त्यांना अंदमानातील पोर्ट ब्लेअरकडे आणत असताना अशा विचित्र मानसिकतेत असतानाही व अत्यंत प्रदीर्घ शिक्षेचा कालावधी असूनही या द्रष्ट्या महापुरुषाने आत्मविश्वासाच्या व आत्मचिंतनाच्या बळावर एक भविष्यवाणी केली, की मला शिक्षा झालेलं हे अंदमानातील पोर्ट ब्लेअर हे ठिकाण भविष्यातील भारताचे नाविक दलाचे मोठे केंद्र होईल. या अंदमानात प्रचंड हालअपेष्टा सहन करत असतानाही त्यांनी आपले कार्य खंडित केले नाही; तर आपल्याबरोबर असणाऱ्या कैद्यांमध्ये एका अनोख्या पद्धतीने वाचनसंस्कृती रुजवली. कैद्यांना त्यांनी असं सांगितलं, की तुमचे नातेवाईक तुम्हाला भेटायला जेव्हा येतात, तेव्हा ते निरनिराळ्या प्रकारचा खाऊ आणतात, मिठाई आणतात. तर ते न आणता तुम्ही त्यांना एक-दोन पुस्तके भेट स्वरूपात आणावयास सांगा आणि या उपक्रमातून या कैद्यांमध्येसुद्धा त्यांनी वाचनाची गोडी निर्माण केली व ग्रंथालय सुरू केले. अशा प्रकारे या कैद्यांमध्ये वैचारिक प्रगल्भता निर्माण करून त्यांनाही स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग करून घेतले.

सावरकरांना जेव्हा रत्नागिरीमध्ये आणलं गेलं तेव्हा त्यांनी समाजक्रांती घडवली. जातीपातीत गुरफटलेल्या समाजाचे प्रबोधन केले. विठ्ठल मंदिर, पतित पावन मंदिर सर्व जातीयांसाठी खुली केली. सावरकरांच्या सामाजिक विचारांचे पैलू मांडताना रवींद्रजींनी काही मुद्दे मांडले. ते म्हणतात की सावरकरांच्या मते :

१) समाजकारण व राजकारण हातात हात घालून गेले पाहिजेत.
२) समकालीन समाजसुधारकांबद्दल कृतज्ञता बाळगली पाहिजे.
३) देशाचा राष्ट्रीय कणा असलेला हिंदू समाज बलशाली केला पाहिजे.
४) वेदोक्त बंदी, व्यवसाय बंदी, स्पर्श बंदी, रोटी बंदी, सिंधू बंदी, शुद्धी बंदी, बेटी बंदी यांसारख्या सप्तशृंखला गळून पडल्या पाहिजेत.
५) तळागाळातील व्यक्तीच्या अंगभूत मूल्यांना साद घालून त्याला स्वातंत्र्याचा आनंद दिला पाहिजे.

असा हा स्वातंत्र्याचा लढा अखेर थांबला. भारत स्वतंत्र झाला. 'सोनियाचा दिवस आजी अमृते पाहिला ।' असा भाव चेहऱ्यावर असलेले सावरकर स्वतः सदनाच्या गच्चीवर एका हातात त्यागाचा भगवा झेंडा व एका हातात तिरंगा घेऊन उभे होते. असे कृतार्थ, ध्येयवादी जीवन व्यतीत करणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर युगपुरुष ठरले.''

या कार्यक्रमाला वैद्यकीय विद्यार्थी, डॉक्टर, नर्सिंग स्टाफ आणि रुग्णालयातील इतर कर्मचारी उपस्थित होते

# 'मॉर्निंग मिस्ट कुकीज'चा शुभारंभ

शुक्रवार, दि. ०३ मार्च २०२३ रोजी डेरवण क्रीडासंकुलात डेरवण यूथ गेम्सच्या शुभारंभप्रसंगी 'मॉर्निंग मिस्ट कुकीज'चा शुभारंभ श्री. कमलेश जोशी यांच्या हस्ते करण्यात आला. या कुकीज कुपोषित मुलांसाठी खास तयार केल्या आहेत. वालावलकर हॉस्पिटल २००३ पासून कुपोषण निर्मूलनावर काम करत आहे. 'वालावलकर लड्डू गोपाळ' योजनेअंतर्गत हॉस्पिटलमध्ये ०-६ वयोगटातील मुलांना पूरक पोषण दिले जाते. त्यासाठी मॉर्निंग मिस्ट कुकीज बनवल्या गेल्या. या कुकीज अनेक प्रकारच्या धान्यांपासून बनवल्या आहेत आणि त्यात उत्तम दर्जाचे लोणी वापरले आहे. कुकीजमध्ये कॅल्शिअम, लोह, प्रथिने आणि फायबरदेखील भरपूर आहे. कार्यक्रमाच्या सर्व निमंत्रितांनी कुकीजची चव आणि कुरकुरीतपणाचे कौतुक केले. या कुकीज पूर्णपणे 'डेरवण कोहार्ट टीम'च्या संकल्पनेतून प्रत्यक्षात आल्या आहेत. क्रीडामहोत्सवाला आलेल्या खेळाडूंकडूनही या कुकीजना मोठा प्रतिसाद मिळाला.




*'मॉर्निंग मिस्ट कुकीज'चे उद्घाटन करताना श्री. कमलेश जोशी आणि डॉ. नीलिमा देशपांडे (भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या वरिष्ठ प्रशिक्षक - पतियाळा, पंजाब, भारत)*




*डावीकडून डॉ. प्रधान गुठडागे, डॉ. ज्योती अय्यर, डॉ. सुनीता पाटील, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. इंदू एस. सावंत मा. कुलगुरू डॉ. संजय सावंत, डॉ. नेताजी पाटील व कृषि विद्यापीठाचे श्री हसबनीस आदी*



*पाहुण्यांचे स्वागत*

# कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत यांची सदिच्छा भेट

शनिवार, दि. ०४ मार्च २०२३ रोजी डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय सावंत आणि डॉ. इंदू एस. सावंत, माजी संचालिका, Indian Council of Agricultural Research, Ministry of Agriculture and Farmers Welfare यांनी भ. क. ल. वालावलकर हॉस्पिटल व रुरल मेडिकल कॉलेज, डेरवण येथे सदिच्छा भेट दिली.

डॉ संजय सावंत यांनी द्राक्ष उत्पादकांसाठी नवे तंत्रज्ञान विकसित केले असून त्यांच्याकडे भारतातील द्राक्षाचे रोग आणि कीटक निदान प्रणालीचे अनेक कॉपीराइट्स आहेत. प्रोसर सिंचन कृषी संशोधन आणि विस्तार केंद्र, वॉशिंग्टन स्टेट युनिव्हर्सिटी, यूएसए; कृषी संशोधन संस्था, इस्रायल; फ्रूट लॉजिस्टिक एक्सपोजर, बर्लिन, जर्मनी अशा अनेक प्रकल्पांमध्ये त्यांनी शास्त्रज्ञ म्हणूनही काम केले आहे. कृषी आणि फलोत्पादन क्षेत्रातील त्यांच्या कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानही मिळाले आहेत. वालावलकर हॉस्पिटलने केलेले काम आणि समाजाच्या कल्याणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांमुळे ते खूप प्रभावित झाले. या सर्व व्यापक कामाकडे पाहताना ते म्हणाले की कृषी विद्यापीठ वालावलकर रुग्णालयाच्या सोबत सहयोग/सहकार्य करण्यास तयार आहे.

# इम्युनो हिस्टो केमिस्ट्री कार्यशाळा



*भ . क . ल . वालावलकर व टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे सहकारी*

रविवार, दि. १९ मार्च २०२३ रोजी भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाने टाटा मेमोरियल हॉस्पिटल मुंबई यांच्या सहकार्याने 'इम्युनो हिस्टो केमिस्ट्री जीनोमिक इन ऑन्कोलॉजी' या विषयावर पॅथॉलॉजिस्टसाठी कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयातील आणि परिसरातील एकूण १४७ डॉक्टरांनी सहभाग घेतला. टाटा मेमोरियल हॉस्पिटलचे शैक्षणिक संचालक डॉ. श्रीपाद बाणावली हे प्रमुख पाहुणे होते. टाटा मेमोरियल पॅथॉलॉजी विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता देसाई या कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या होत्या. डॉ. तनुजा शेठ, डॉ. केदार देवधर, डॉ. श्रीधर ईपारी, डॉ. स्वप्नील राणे, डॉ. आशुतोष जैन हे इतर वक्ते उपस्थित होते.



*डावीकडून डॉ. नेताजी पाटील, डॉ. आशुतोष जैन, डॉ. संदीप ईशी, डॉ. आनंद जोशी, डॉ. स्वप्नील राणे, डॉ. श्रीपाद बाणवली, डॉ संगीता देसाई, डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. रिटा मुल्हेरकर, डॉ. तनुजा शेठ, डॉ. केदार देवधर, डॉ. श्रीधर ईपारी*

'इम्युनो हिस्टो केमिस्ट्री' ही एक प्रयोगशाळापद्धत आहे जी कर्करोगाचे निदान करण्यासाठी वापरली जाते. कर्करोगाच्या विविध प्रकारांमधील फरक सांगण्यासाठी देखील याचा वापर केला जाऊ शकतो. इम्युनो हिस्टो केमिस्ट्री हे नियमितपणे वापरले जाणारे तंत्र आहे आणि परिणाम अगदी अचूक आहेत. या चाचण्या नियमितपणे स्तनाच्या कर्करोगाच्या प्रकारांचे निदान करण्यासाठी वापरल्या जातात. स्तनाच्या आक्रमक तसेच मेटास्टॅटिक कर्करोगावर उत्तम आणि अचूक उपाययोजना आता वालावलकर हॉस्पिटल मध्ये करता येणार आहे. कोकणवासीयांना ही एक उत्तम सुविधा उपलब्ध झाली आहे.

# वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय महिला दिन

आंतरराष्टीय महिला दिनानिमित्त दि. २ मार्च ते ८ मार्चपर्यंत भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कम्युनिटी विभागाने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते, आठवडाभर चालेल्या या कार्यक्रमात वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी, डॉक्टर व इतर कर्मचारी सहभागी झाले होते.

दि. २ मार्चला 'आई आणि मी' ही स्पर्धा घेण्यात आली. त्या निमित्ताने सर्व महिलांना त्यांच्या स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी एक व्यासपीठ प्राप्त झाले. स्पर्धांमध्ये आई-मुलीने जोडीने भाग घेतला आणि त्यांचे विचार मांडले. नर्सिंग स्टाफमधून रुचिरा नांदोस्कर आणि त्यांची कन्या ग्रीष्मा यांना प्रथम पारितोषिक मिळाले. अश्विनी कदम आणि त्यांची कन्या विजयश्री यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. कम्युनिटी मेडिसिन विभागातील डॉ. नमिता देशमुख बोरकर आणि त्यांची कन्या अद्विका यांनी तिसरे पारितोषिक मिळवले.

दि. ०३/०३/२०२३ रोजी झालेल्या वादविवाद स्पर्धेत वैद्यकीय पदवीधर विद्यार्थ्यांनी भाग घेतला. विषय: "Equal opportunities are not enough for woman empowerment." कल्याणी कंठाळे या २०२२ च्या बॅचमधील विद्यार्थिनीला सर्वोत्कृष्ट वादविवाद स्पर्धक घोषित करण्यात आले.

दि. ०४/०३/२०२३ रोजी पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती आणि थीम होती 'डिजिट ऑल: इनोव्हेशन आणि लैंगिक समानतेसाठी तंत्रज्ञान'. एकूण ४० वैद्यकीय पदवीधर विद्यार्थी त्यात सहभागी झाले होते. २०२२ बॅचच्या रेवती मंजुळ, पर्णवी वाघमारे, अपर्णा विभुते यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकचे पारितोषिक मिळाले.

दि. ०४/०३/२०२३ रोजी 'सुंदर तू, सुंदर मी' स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धामध्ये डॉक्टर, परिचारिका, मेडिकल कॉलेजचे शिक्षक व इतर कर्मचारी सहभगी झाले होते. या स्पर्धेत केशरचना, मेक-अप, मेहेंदी आणि टॅटू हे विभाग होते.

१. सर्वोत्कृष्ट केशरचना: वैष्णवी पवार आणि अनुजा राऊत
२. सर्वोत्कृष्ट टॅटू: वैष्णवी घाडगे
३. सर्वोत्कृष्ट मेकअप: नयन केळशीकर
४. सर्वोत्कृष्ट मेहेंदी: वैष्णवी गंभीरे

**कृतज्ञता भिंत :** यामध्ये सर्व पुरुष डॉक्टर्स, विद्यार्थी व इतर कर्मचारी सहभागी झाले होते, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या महिलांबद्दल त्यांनी आपले मत व्यक्त केले.

दि. ०८.०३. २०२३ रोजी भारतातील प्रेरणादायी, सन्माननीय आणि कर्तृत्ववान महिलांच्या जीवनावर नर्सिंग स्टाफने एक छोटासा कार्यक्रम सादर केला. तसेच इतर कर्मचारी आणि एम.बी.बी.एस.च्या २०२२ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी नृत्ये सादर केली.



*सर्वोत्कृष्ट केशरचना*




*वक्तृत्वस्पर्धा*

भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : Reception No. (Hospital) : 8847790149 MSW (Social worker) : 9356427731
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

२०२३ ची भारतातील आंतरराष्ट्रीय महिला दिनाची थिम - "Digit ALL - Innovation and technology for gender equality" या विषयाशी संबंधित या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या डॉ. नेहा देशपांडे, सहयोगी प्राध्यापिका (इलेक्ट्रॉनिक्स), एस.एस.डी. कॉलेज पुणे. या होत्या. वालावलकर वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन डॉ. मानसिंगराव घाडगे हेही उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी अगदी सोप्या भाषेत तंत्रज्ञान कसे वापरावे हे समजावून सांगितले. आपल्या दैनंदिन जीवनात अधिकाधिक तंत्रज्ञान कसे वापरले जाऊ शकते जेणेकरून आपले जीवन सोपे होईल; आणि तंत्रज्ञानाचा वापर करताना कोणती सावधगिरी बाळगली पाहिजे, हे त्यांनी नमूद केले. पाहुण्यांच्या हस्ते विविध स्पर्धांमधील विजेत्यांना बक्षीसे देण्यात आली. आभार प्रदर्शनानंतर समारंभाची सांगता झाली.



*पोस्टर स्पर्धा*



*पोस्टर स्पर्धा*



*वक्तृत्व स्पर्धा*

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्री. विकासराव वालावलकर यांनी श्रीमुद्रा, १८१, शुक्रवार पेठ, पुणे - २ येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी ४१५ ६३९ येथून प्रकाशित केले.
Visit us at https://swamisamarth.com/dervan// कार्यकारी संपादिका : डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५,
उपसंपादक : सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०